# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.

जा.क्र.भिनिशमनपा/आस्थापना/४१६/२०१७
दिनांक: ३० /०७ /२०१७

**आदेश,**

१)मा.सर्वोच्च न्यायालयाचा,सचिव,कर्नाटक राज्य व इतर विरूध्द श्रीम.उमादेवी व इतर या दाव्याच्या निर्णयातील परिच्छेद क्रमांक १२ मध्ये खालील प्रमाणे नमुद केले आहे.

In this context, we have also to bear in mind the exposition of law by a Constitution Bench in State of Punjab Vs Jagdip Singh & Ors.(1964(4)SCR964). It was held therein," In our opinion, where a Government servant has no right to a post or to a particular status, though an authority under the Government acting beyond its competence had purported to give that person a status which it was not entitled to give, he will not in law be deemed to have been validly appointed to the post or given the particular status."

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील याचिका क्र.१९५०, १९५२, १९५३, १९५८/२०१४ मधील दि.१४/०७/२०१४ रोजीच्या याचिका क्र. १९५०/२०१४ मधील आदेशा मध्ये मा.उच्च न्यायालयाने परिच्छेद क्र.५ मध्ये खालील प्रमाणे नमुद केले आहे.

"The argument that if the concerned workmen are asked to work as Safai Kamgar , at this stage, it is on these posts they are appointed and they are expected to do work as safai Kamgar."

महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र. एसआरव्ही-२००५/ प्र.क्र. ४७/०५/१२,दि.२५/०८/२००५ आणि नगर विकास विभागाकडील पत्र क्र.अमपा २४०५/ १२१५/प्र.क्र.१९६/नवि-२६,दि.१७/०४/२००६ मधील आदेश, विचारात घेता सर्व पदावरील नियुक्त्या विहित मार्गाने/पध्दतीने करणे आवश्यक आहे.त्याशिवाय कोणत्याही कर्मचाऱ्याच्या सेवा नियमित करता येत नाहीत. तात्पुरत्या/अस्थायी स्वरूपात नियुक्त केलेला कर्मचारी या पदावर कितीही वर्ष सेवेत राहीला तरी कायम करण्याचा हक्क सांगू शकत नाही.

२)मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय व महानगरपालिका क्षेत्रातील स्वच्छता चांगल्या प्रकारे होण्यासाठी यापुर्वीच्या सर्व आदेशांचे अधिक्रमण करुन सफाई कर्मचाऱ्यांना स्वच्छता गट नेमुन देण्यात येत आहेत.त्यानुसार महानगरपालिका क्षेत्रांचे एकूण १२७० इतक्या स्वच्छता गटांमध्ये लोकसंखेच्या प्रमाणात विभागणी करण्यात आली असून,सोबत दर्शविलेल्या यादीनुसार सफाई कर्मचाऱ्यांना स्वच्छता गट नेमून देण्यात येत आहे.

३)सफाई कर्मचारी यांनी त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या स्वच्छता गटात (त्यांच्या चतु:सिमेनुसार) हजर राहून रस्ता,सार्वजनिक जागा,खाजगी जागेत नागरिकांनी टाकलेला कचरा,मनपा मैदाने,मनपा इमारती, गटार इत्यादींची साफ सफाईचे काम करावयाचे आहे.

४)गटार सफाई करिता जास्तीचे कर्मचारी लागणार असल्यास गटार सफाईची लांबी-रुंदी विचारात घेवुन प्रभाग आरोग्य निरिक्षक यांनी स्वच्छता गटातील कर्मचारी एकत्रित करुन गटार साफ करणेचे नियोजन करावे परंतु त्यांच्या मुळ स्वच्छतेच्या गटाच्या कामावर परिणाम होणार नाही.याची दक्षता घ्यावी.

५)या कर्मचाऱ्यांवर संबंधित सफाई मुकादम,आरोग्य निरिक्षक, प्रभाग आरोग्य निरिक्षक आणि संबंधित प्रभाग अधिकारी यांचे नियंत्रण असेल. स्वच्छता गटातील साफसफाईची, स्वच्छतेची संपूर्ण जबाबदारी संबंधित कर्मचाऱ्यावर असेल. कर्मचारी दिर्घकाळ रजेवर जाणार असल्यास त्या ठिकाणी बदली कर्मचारी अथवा स्थानिक व्यवस्था करून त्या स्वच्छता गटाची साफसफाई करून घेण्याची जबाबदारी प्रभाग अधिकारी व प्रभाग आरोग्य निरिक्षक यांची राहील.तसेच ज्या स्वच्छता गटात एकच महिला कर्मचारी असेल अशा ठिकाणी गटार सफाई करिता आवश्यक असल्यास इतर कर्मचा-यांचे नियोजन करणेची जबाबदारी प्रभाग अधिकारी व प्रभाग आरोग्य निरीक्षक यांचेवर राहिल.

६)मनपाच्या आस्थापना व इमारतींकरीता संबंधित गटात जास्तीचे सफाई कर्मचारी दर्शविण्यात आले आहेत.त्यांचेकडून त्या इमारतींचे साफसफाईचे काम करून घेण्यात यावे.दोन स्वच्छता गटामध्ये भाग अथवा रस्ता असल्यास तो दोन्ही स्वच्छता गटांच्या कर्मचाऱ्यांना अर्धा अर्धा असा वाटप करण्यात यावा.

७)क्षेपणभूमी येथे सफाई कर्मचारी तसेच तेथील जंतुनाशक फवारणीसाठी स्वतंत्र कर्मचारी दिले असून त्यांची नावे त्या स्वच्छता गटामध्ये दर्शविण्यात आली आहेत.

८)प्रभाग अधिकारी व प्रभाग आरोग्य निरिक्षक यांनी स्वच्छता गट निहाय स्वच्छता दुत नेमण्याची व्यवस्था करावी.

९)सर्व स्वच्छता गटांसाठी सफाई कर्मचा-यांनी History Sheet ठेवावे त्यामध्ये केलेल्या स्वच्छतेच्या कामाची योग्य दैनंदिन नोंद ठेवणे याची जबाबदारी प्रभाग आरोग्य निरिक्षक व आरोग्य निरिक्षक यांची राहिल.त्यासाठी स्वच्छता दुतांची मदत घ्यावी.

१०)स्वच्छतेची पाहणी करणेसाठी नियंत्रण अधिकारी,विभाग प्रमुख नेमले जातील,संबंधित अधिकारी त्यांना नेमुन दिलेल्या दिवशी संबंधित स्वच्छता कामाची पाहणी करुन अहवाल सादर करतील.

११)यानुसार प्रभाग अधिकारी, संबंधित प्रभाग स्वच्छता निरिक्षक,स्वच्छता निरिक्षक यांनी स्वच्छता गटनिहाय सफाई कर्मचारी काम करतील याची दक्षता घ्यावी.

१२)सफाई कर्मचाऱ्याला स्वच्छता गटाच्या सोबतच्या नकाशानुसार चतु:सिमा दाखविण्याची जबाबदारी प्रभाग अधिकारी,प्रभाग स्वच्छता निरिक्षक व स्वच्छता निरिक्षक यांची असेल, आवश्यक तेथे प्रभाग अधिकाऱ्यांनी वसुली लिपीकांची मदत घ्यावी.

१३)स्वच्छता गट व त्यांचा नकाशा व त्या गटांसाठी नियुक्त कर्मचारी यांची प्रत संबधित मा.नगरसेवकांना उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित प्रभाग आरोग्य निरिक्षकांची असेल.

सदर आदेशाची अंमलबजावणी दि.०१/०२/२०१७ पासुन करण्यात येईल.

आयुक्त,
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

प्रति,
संबंधित सफाई कर्मचारी,
प्रत,

१. सहा-आयुक्त (आरोग्य),
२. प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ ते ५,
३. सर्व विभाग प्रमुख
४. आरोग्य व स्वच्छता विभाग,
५. प्रभाग आरोग्य निरिक्षक,प्र.स.क्र.१ ते ५
६. संगणक विभाग.